Mangrove (तक्रार क्र. 146)

E:\back up data 2.1.20\pp\KANDALVAN\KANDALVAN Noting & Letter. (Autosaved).docx



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग**
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:- tahasildarmahasul@gmail.com ❖

क्र.मशा/जमीन/अ-०३/तक्रार/६०००७/२०२१ दिनांक :- /१२/२०२१

२५/०१/२०२२

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**विषय :-Mangrove destruction near lingeshwar mandir, ulwe, Navi Mumbai**

संदर्भ :- सदस्य सचिव, राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र दि.२४/०९/२०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, अर्जदार विमल किर्ती यांनी उलवे येथील लिंगेश्वर मंदिराजवळ कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी ओवळे यांचेमार्फत चौकशी केली असून, तहसिलदार पनवेल यांनी दि.२१/१०/२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडे सादर केलेल्या त्यांचेकडील दि.२५/१०/२०२१ व दि.२२/१२/२०२१ च्या अहवालान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर करण्यांत येत आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | विमल किर्ती |
| २ | तक्रारीचा विषय | **Mangrove destruction near lingeshwar mandir, ulwe, Navi Mumbai. ( तक्रार क्र.१४६)** |
| ३ | तक्रारीशी संबधित जागेचा तपशील उदा.स.नं. गावाचे नांव, तालुका | उलवे येथील लिंगेश्वर मंदिराजवळ उल्वे, ता.पनवेल |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | श्री.गणेश तेलंगे, मंडळ अधिकारी ओवळे |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | मौजे वहाळ (मोरावे), ता.पनवेल येथील लिंगेश्वर मंदिर येथे गुगल मॅप मधील अक्षांश व रेखांश १८-९८०८२५ व ७३.०१८६४१ असा असून सदर गुगल मॅपनुसार डेब्रिज भराव केलेल्या जागेवर कांदळवन नसल्याचे दिसून येत आहे. सदर स.नं.१०२ क्षेत्र ३-०९-०० हे.आर.या सिडकोच्या मालकीच्या जागेमध्ये सुमारे सहा-सात महिन्यापूर्वी डेब्रिजचा भराव केल्याचे दिसून आले आहे. याबाबत चौकशी केली असता डेब्रिजचा भराव कोणी केला हे समजून येत नाही. तक्रार अर्जासोबत तक्रारदार यांचा संपर्क क्रमांक नसल्याने त्यांना स्थळपाहणीच्या वेळी बोलविता आले नाही.<br>गुगल मॅप मधील अक्षांश व रेखांश १८-९८०८२५ व ७३.०१८६४१ नुसार या क्षेत्रामध्ये आजरोजी कांदळवन सदृष्य वस्तुस्थिती दिसून येत नाही. मात्र भरावाचे लगत पश्चिम दिशेला कांदळवन असल्याचे दिसून येत आहे. सदर जमीन स.नं.१०२ क्षेत्र ०३-०९-०० हे.आर.ही सिडकोच्या मालकीची असल्याचे दिसून येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | श्री.लिंगेश्वर मंदिराजवळ असलेली जमीन गट क्र.१०२ असून क्षेत्र ३.०९.० हे.आर. आहे. सदर जमिनीचा ७/१२ पहाता भोगवटादार सदरी शासनातर्फे सिडको अशी नोंद आहे. त्यानुसार सदर जमीन सिडकोच्या ताबे कब्जामध्ये आहे. या जमिनीपैकी सुमारे ३०० चौ.मी.जागेमध्ये डेब्रिजचा भराव केलेला दिसून येत आहे. या भरावालगत पश्चिमेकडे कांदळवन आहे. सदरचा भराव कांदळवन असलेल्या क्षेत्रापासून ५० मिटरच्या आत असल्याचे दिसून येत आहे. |
| ६ | कांदळवनाचा /पाणथळाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | सदरचा भराव कांदळवन असलेल्या क्षेत्रापासून ५० मिटरच्या आत असल्याने कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे असे दिसून येते. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस स्थानकाचे नांव | FIR NO.०००९,दिनांक ०७/०१/२०२२ एन.आर.आय.सागरी पोलिस ठाणे, नवी मुंबई |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता. | अनोळखी व्यक्ती |
| ९ | कोणत्या कायदयाअंतर्गत /कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ कलम १५(१) |

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालाची प्रत व त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहेत.

स्वाक्षरी/-
(डॉ.महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी रायगड

प्रत:- मा.अवर सचिव, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी, पर्यावरण विभाग, १५ वा मजला,नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचेकडे सविनय सादर.

प्रत:- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे सविनय सादर.

स्वाक्षरी/-
(डॉ.महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी रायगड

जावक
तारीख- 27 JAN 2022
सही-